# स्वतंत्रता-संग्राम आणि मराठी कविता

**डॉ सुनील अभिमान अवचार** मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ,मुंबई

---

## सांस्कृतिक-राजकीय पार्श्वभूमी

कुठलीही कलाकृती ही त्या त्या काळाचे अपत्य असते. 'स्वातंत्र्य चळवळीत निर्माण झालेली मराठी कविता' ही इंग्रज काळाचे अपत्य आहे. या कालखंडात तमाम भारतीयांमध्ये राष्ट्रीय भान निर्माण करण्याची चळवळ लो. टिळक व त्यांचे सहकारी चालवीत होते, तर सामाजिक भान देण्याची चळवळ म.गो.रानडे, लोकहितवादी, महात्मा फुले आदी समाजसुधारक व विचारवंत चालवत होते. भारतामध्ये सामाजिक स्वातंत्र्य आणि राजकीय स्वातंत्र्याची चळवळ ही अशा पद्धतीने सुरू होती. लोकमान्य टिळक आणि म.गांधी राजकीय स्वातंत्र्याची लढाई लढत होते. तर दुसरीकडे राजर्षी शाहू महाराज, लोकहितवादी, आगरकर, महात्मा फुले यांनी मात्र देशांमध्ये सामाजिक समता निर्माण झाल्या शिवाय भारतीयांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याला अर्थ नसेल अशी भूमिका घेतलेली दिसून येते. या पार्श्वभूमीवर तत्कालीन मराठी कवितेचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा तिच्यावर विविध स्थित्यंतराचा परिणाम झालेला आढळतो. या काळात लिहिणा-या कवींच्या वृत्ती-प्रवृत्तीमध्ये अनेक परिवर्तने होत गेलेली दिसतात. संतांची कविता, पंडित आणि शाहिरी कविता अशा तीन प्रवाहांनी प्राचीन कालखंडात मराठी कवितेचे भरण पोषण केले. इंग्रजी कवितेच्या परिचयाने मात्र मराठी कवितेची आशय अभिव्यक्ती बदलली. याचाच परिणाम म्हणजे केशवसुत आधुनिक कवितेचे शिल्पकार म्हणून नावारूपाला आले. मराठी कवितेचा प्रवास शेकडो वर्षांपासून सुरू आहे. विविध वळणवाटा तिने पार केलेल्या आहेत. तिच्या काव्य प्रकारातही बहुविधता दडलेली आहे. महाकाव्ये, खंडकाव्ये, भावगीते, समरगीते, पोवाडे, लावण्या, बालगीते, मुक्तछंद, गझल, हायकू, अभंग, ओवी इत्यादी विविध रुपांमधून ही बहुविधता आढळून येते. मराठीमध्ये देशभक्तीपर, राष्ट्रीय बाण्याच्या कवितेमध्ये कवी विनायक-गोविंद- तिवारी- सावरकर- माधव अशी प्रभावी परंपरा इंग्रज काळात निर्माण झाली होती. मराठीत भक्तीपर, निसर्गपर आणि राष्ट्रीय स्वरूपाचे कविता लेखन झाले आहे. देशभक्तीपर, 'राष्ट्रीय कवी' आपल्या मराठीत निर्माण झाले. त्याचा आढावा प्रस्तुत निबंधात घ्यायचा आहे.

## इंग्रजी राजवट आणि कवितांवरील बंदी

स्वातंत्र्याची मागणी करणारी, बहिष्कार, असहकार, इंग्रजी सत्तेविरोधात सर्वांना एक होण्याचे आव्हान करत इंग्रज काळातील कविता आविष्कारत होती, ही कविता इंग्रज सरकारच्या विरोधात असल्यामुळे तिच्यावर बंदी घालण्यात आली होती. सावरकरांची 'गोमांतक', 'श्री बाजी देशपांडे' आणि 'सिंहगडचा पोवाडा' तर कवी गोविंद यांचा 'अफजलखान वधाचा पोवाडा', साने गुरुजी यांच्या 'पत्री' या काव्यसंग्रहातील' 'सत्याग्रही', 'देशभक्ती', 'किती ते मरती', 'तुफान आलं', 'स्वातंत्र्य', 'सुसंस्कृत कोण?', 'प्रतिज्ञा', आणि 'खंडकाव्य' या कवितांमधील विद्रोह इंग्रजांना अपत्तीजनक वाटल्यामुळे त्यांच्यावर बंदी घालण्यात आली होती. ह्या बंदीला न जुमानता देशभर विविध भाषेमध्ये कविता लिहिल्या जात होत्या. 'वंदे मातरम्', 'जन गण मन', ही गीतं लोकांच्या ओठावर होते. 'ए मेरे वतन के लोगो', 'कदम कदम बढाया जाए', 'ए मेरे प्यारे वतन', 'जयोस्तुते…' इत्यादी कवितांचा उल्लेखही करता येईल. या काळात काव्यावर बंदी येत असली तरी लोकांच्या अंतकरणात कविता नव्याने उगवून येत होती, स्वातंत्र्य चळवळीत लोकांमध्ये चेतना निर्माण करत होती. मराठी साहित्यातील देशभक्तीचा प्रवाह कवी विनायक यांच्यापासून ख-या अर्थाने सुरू झाला आहे. त्यांची कविता आणि इतर निवडक कवितांचा याठिकाणी आपणास प्रामुख्याने विचार करावयाचा आहे.

## कवी विनायक (विनायक जनार्दन करंदीकर १८७३-१९०९)

कवी विनायक यांना 'राष्ट्रीय कवी' म्हणून संबोधण्यात येते. त्यांनी ऐतिहासिक कथा, काव्याच्या माध्यमातून भारताच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून दिले आहे. त्यांचे 'अहिल्या', 'राणी दुर्गावती', 'संयोगिता', 'वीरमती' इत्यादी ऐतिहासिक कथा-काव्य प्रसिद्ध आहे. यामधून त्यांनी देशभक्ती, राष्ट्रीयत्व आदींचा आविष्कार केला आहे.

राजकीय पारतंत्र्याविषयी तीव्र चीड त्यांनी या काव्यामधून व्यक्त केली आहे.'महाराष्ट्र लक्ष्मी' सारख्या कवितेमध्ये 'पूर्वदिव्य ज्यांचे त्यांचा रम्य भावी काळ' असे स्फूर्तिदायक चित्र रंगविण्याचे कामही कवी विनायक यांनी केले आहे. उदात्त आशावाद, शिवरायांचा आदर्श त्यांनी वाचकांपुढे ठेवला आहे. 'स्वतंत्रतेस', 'श्री शिवछत्रपती', 'भगवा झेंडा', 'मावळ्यांस आमंत्रण' अशी राष्ट्रीय वृत्तीची त्यांची कविता आहे. देशभक्ती हा रस त्यांच्या काव्याचा स्थायीभाव आहे.

**कवी गोविंद (गोविंद ऊर्फ बाबा दरेकर १८७४-१९२६)**

कवी गोविंद यांना वि. दा. सावरकर यांचा सहवास लाभला त्यामुळे त्यांच्यात देशभक्तीपर भावना रूजली व वाढीला लागली. 'टिळकांची भूपाळी' ही त्यांची गाजलेली कविता असून त्यांच्या एकूण कवितेतून स्वातंत्र्यप्राप्ती, न्यायाची चाळ व्यक्त होते.

'जगणे ते जगणे प्रभूप्रमाणे मरणे क्षण जगणार
मरण्याविरहित जगणे मिळवू असा करू निर्धार'

अशा ओळीतून त्यांच्या कणखर मनाची प्रचिती येते. ध्येयवाद आणि निर्भयता त्यांच्या कवितेत ओतप्रोत भरलेली आहे.

**दु. आ. तिवारी (दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी १८८७-१९३९)**

यांनीही आधुनिक मराठीतील राष्ट्रीय आणि ऐतिहासिक कवितांचे दालन समृद्ध केले आहे. 'महाराणा प्रतापसिंह', 'मनोहर लीला' हे त्यांचे ऐतिहासिक खंडकाव्य त्याचबरोबर 'मराठयांची संग्रामगीते' (१९२०) आणि 'झाशीची संग्रामदेवता' (१९२५) असे महत्वपूर्ण काव्यलेखन त्यांच्या नावावर आहे. त्यांची मातृभाषा हिंदी असूनही मराठीमध्ये काव्यरचना लिहून त्यांनी मराठीवरील आपले प्रेम व्यक्त केले आहे.

'मर्दानी बांधून फेटा, चिलखत चढवी अंगात |
जहरी जंबिया कमरेला- नंगी समशेर करात ||
पाठीस बांधला पुत्र – करवाळुनि वात्सल्यात
'अस्मानफेक' जातीच्या-वेगी चढत्या छातीच्या ||
तुरुंगी चढली त्वेषाच्या
फोडावा दुर्गम वेढा फेकला तटाहून घोडा'||

अशा शब्दात समर्पक शब्दचित्र तिवारी यांनी रेखाटले आहे.

**आज्ञातवासी (ऊर्फ दिनकर गंगाधर केळकर १८९६)**

'आज्ञातवासी' (१९२४) व 'आज्ञातवासीची कविता (१९३३)' या दोन संग्रहात त्यांची कविता प्रसिद्ध झाली आहे. यांचीही कविता राष्ट्रीय परंपरेत मोडणारी कविता आहे. "ध्यास मायभूमी तुझा लागला मंदतरी" या मायभूमी विषयक कवितेनेच त्यांना काव्य दिनकर केले आहे. महाराष्ट्राच्या गत इतिहासाची प्रसंगचित्रे त्यांनी उत्कटतेने आपल्या कवितेतून उभी केली आहेत. विशेषत पानीपतच्या युद्धात जाणाऱ्या 'नवलाख लष्करांचे' त्यांनी आपल्या कवितेतून केलेले वर्णन काव्यरसिकांचे मन खेचून घेणारे आहे.

**कवि माधव (माधव उर्फ माधव केशव काटदरे १८९२)**

१९२० नंतरच्या कवितेत सावरकर व कवी गोविंद यांच्या नंतरचे महत्वाचे कवी म्हणून कवी माधव यांना स्थान दयावे लागते.

"मराठयांच्या इतिहसीतल नाटयमय प्रसंगाची निवड आणि रेखीव शब्दकळा व मोजक्या पण समुचित अलंकारांची योजना करून त्यांनी केलेली सजावट या त्यांच्या कवित्वचा गुणविशेषांचा परिचय त्यांच्या कवितेतून घडतो. 'शनिवारवाडयापुढे', ' तारापूरचा संग्राम', 'सवाई माधवरावांचा मृत्यू', 'रावजीचे राज्यदान', 'पानिपतच्या सुड', 'मस्तानी' इत्यादि कवितांवरून हा परिचय सहज होण्यासारखा आहे". याचबरोबर त्यांच्या ऐतिहासिक स्वरूपाच्या कविता 'ध्रुवावरील फुले', व 'फेकलेली फुले' या दोन काव्यसंग्रहात समाविष्ट आहेत. एकूणच महत्त्वाची राष्ट्रीय आणि ऐतिहासिक कविता कवी माधव यांच्या नावावर आहे.

**वि . दा . सावरकर (विनायक दामोदर सावरकर १८८३ -१९६६)**

सावरकरानी स्वत:ला 'महाराष्ट्र भाट' असे म्हंटले आहे. त्यांच्या काव्यात करुण, रौद्र, भयानक रसांचे मिश्रण आहे. सावरकरांनी बंदिवासात असतांना कारागृहाच्या भिंतीवर काव्य लेखन केले होते. राष्ट्रकार्य हेच त्यांचे सर्वोच्च्य काम होते. राष्ट्रभक्तीचे साधन म्हणूनच त्यांनी साहित्य निर्मिती केली. मुंबई येथे १९३८ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय भाषणाच्या शेवटी त्यांनी 'लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या' असा संदेश दिला होता. 'सागरास', 'आत्मबल', 'स्वातंत्र्याचे स्तोत्र', 'माझे मृत्यूपत्र' इत्यादी त्यांची भावगीते महत्त्वाची आहेत. 'सागरास' या गीतात ते म्हणतात,

'ने मजसी ने परत मातृभूमीला,
सागरा प्राण तळमळला ||धृ ||'

या ओळीतून त्यांची मातृभूमी बद्दलची प्रचंड आस, उत्कटता व्यक्त झाली आहे.

**साने गुरुजी (पांडुरंग सदाशिव साने)**

साने गुरुजी देशभक्त, सामाजिक सांस्कृतिक लढयाचे शिपाई म्हणून अजरामर झाले. 'पत्री' या प्रसिद्ध काव्यसंग्रहातून त्यांनी देशभक्तीपर आणि ईश्वरभक्तीपर काव्य लिहिले आहे. शालीनता, सहृदयता हे त्यांच्या कवितेचे आणि व्यक्तिमत्वाचे विशेष आहेत. १९२० साली शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवादला चे कार्य त्यांनी केले. 'बलसागर भारत होवो', 'आता उठवू सारे रान' या त्यांच्या कवितांवर तत्कालीन इंग्रज सरकारने बंदी घातली. आपल्या या कवितेते ते म्हणतात,

''बहू भाग्याने बहू पुण्याने,आलो तव संतान |
तव सेवा मम हातून होता हरवो माझा प्राण ||

किंवा

स्वार्थीची करून होळी |
छातीवर झेलू गोळी ||
करू मृत्यूशी खेळी मेळी |
मातृभूमीच्या साठी करू सारे बलिदान ||

राष्ट्रभूमीसाठी त्यागाची आणि मातृभूमीसाठी उत्कट भाव त्यांच्या काव्यातून व्यक्त झाला आहे. 'सत्याग्रही' हे साने गुरुजीचे खंडकाव्य. त्यातून करुण, शांत तसेच वीररसाचे दर्शन ओथंबून आलेले दिसते. विशेष म्हणजे 'श्यामची आई' हे त्यांची कादंबरी त्यांनी नाशिकच्या कारागृहात असतांना लिहिली आहे. 'कमला' आणि 'गोमंतक' हे महाकाव्य स्वरूपाचे काव्यदेखील त्यांनी लिहिले आहे. भावोत्कटता,वीररसयुक्तता हे त्यांच्या काव्याचे गुण रसिक मनाला भुरळ घालतात.

**टेकाडे,बेहरे व बापट**

आनंदराव कृष्णाजी टेकाडे यांनी 'आनंदगीता', ना. के. बेहरे यांच्या 'मोत्यांची माळ', सेनापती बापट यांचे सेनापती समग्र' मधून वीर, करुण,भक्ती आणि अद्भुत रसाचे देशभक्तीपर काव्य लिहिल्याचे आढळते.

**इतर देशभक्ती- ऐतिहासिक कवी आणि त्यांची कविता**

याच कालखंडात अनेकांनी देशभक्तीपर तसेच ऐतिहासिक काव्य लेखन केलेले दिसते. त्याचा आढावा थोडक्यात आपल्याला घेता येईल. दि. कृ. काकटे यांचे 'शिवछत्रपतींची पहिली शपथ (१९२८), य. खं. कुलकर्णी यांनी "नरवीर मालुसरे' (१९३६) हे काव्य लिहिले. बा. बा. घाटे यांचे बजाजी निंबाळकर व हिरकणीवर आधारलेले 'शिववात्सल्य' हे काव्य आहे. तर 'सुभेदाराची सून' (१९३४) हे त्र्यं. गं. घारपुरे यांचे काव्य आहे. मो. वि. जोशी यांचे 'श्री

छत्रपती काव्य' (१९३१), राजारामकालीन कथानक असलेले वा. भा. दामले यांचे 'स्वातंत्र्यसमर' हे काव्य आहे. शिवचरित्र गुंफलेले रा. रा. नाबरांचे 'शिवप्रताप' (१९३४) हे काव्य आहे. ए. मा. निफाडकरांचे 'सोनपत पानपत अथवा सोक्षमोक्ष' (१९२३) तर अल्लाउद्दीन खिलजीच्या कथेवर आधारलेले 'सतीचा शाप' (१९२४), गो. रा. हिंगणेकरांची 'दख्खनचा वीर' (१९२१) व 'पावनखिंड (१९२७) ही ऐतिहासिक खंडकाव्ये आहेत. मनोहरांचे 'छत्रपती' (१९२२) या काव्याचाही समावेश यात होतो.

ऐतिहासिक विषयावरील काव्यांप्रमाणेच राष्ट्रीय कविताही या काळात अनेकांनी लिहिलेल्या दिसतात. त्यात काही पोवाडेपण आहेत. इंग्रजी कालखंडात भौतिकशास्त्राच्या प्रभावामुळे शिवकालातील आणि पेशवाईतील पोवाडयांची परंपरा खंडित होणार असे वाटत असतानाच अनेक कवींनी ही परंपरा आपल्या काव्यातून पुढे सुरु ठेवलेली दिसते. आधुनिक मराठी शाहिरांनी आपल्या स्फूर्तीदायक वाणीने महाराष्ट्रीयांची राष्ट्रभक्ती प्रज्ज्वलित केलेली दिसते. अर्वाचीन काळातील पहिला पोवाडा हरिभाऊ आपट्यांचा आहे. वीर सावरकर, कवी गोविंद यांनीही पोवाडे रचले. ही शाहिरी परंपरा पुढे चालवण्यात अनेकांचे योगदान दिसते. पांडुरंग खाडीलकर, रंगनाथ खाडिलकर, प्रल्हाद जामखेडकर, अनंत अडविलकर, श्रीधर अभ्यंकर, दाजी आपटे, बी. डी. कराडकर, काणे, कामत, कारखानीस, कुलकर्णी, आण्णाभाऊ साठे, नेने, पाटील, जोशी अशा अगणित कवींनी शाहिरी स्फुरण रचना केली. इ.स १९२० ते १९५० पर्यंत शिवाजी महाराज ते गांधी, नेहरूपर्यंत राष्ट्रकार्यात समर्पित असणारे थोर वीर व्यक्तींच्या कर्तृत्वाचे गुणगान गाणारे हे पोवाडे आहेत. तसेच हिंदू समाज संघटना, ग्रामसुधारणा, स्त्रीसुधारणा, सुशिक्षितांची बेकारी, प्रौढशिक्षण, बुवाबाजी, दारूबंदी आणि संयुक्त महाराष्ट्र निर्मिती या प्रश्नांबाबत लोकमत निर्माण करून त्यास योग्य वळण देण्याचा प्रयत्न पोवाडयां मार्फत झाला आहे. पोवाडयांचा उपयोग खेडोपाडयातून अनेकविध उपक्रमांच्या प्रचारासाठी करण्यात येत असे.

**समारोप**

स्वातंत्र्य चळवळीतून निर्माण झालेल्या 'राष्ट्रीय कवितेचा' जेव्हा आपण विचार करतो तेव्हा आपणास असे लक्षात येते की, या काळातील कवितेतील सांस्कृतिक , राजकीय संदर्भ मोलाचे आहेत. वि.दा.सावरकर, कवी गोविंद, साने गुरुजी यांच्या कवितेची अभिव्यक्ती आजही रसिक मनावर राज्य करणारी ठरली आहे. या काळातील राष्ट्रीय कवितेचे आणखी एक विशेष म्हणजे तिने ऐतिहासिक घटना, प्रसंग, व्यक्ती यांना निवडून देशभक्तीची योजना निर्माण करण्याचे प्रभावी साधन म्हणून वापर केला आहे. पोवाडा सारख्या फॉर्म चा 'राष्ट्रभक्ती' साठी प्रभावी वापर केला आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी राष्ट्रीय कवितेसंदर्भात, तिच्या उज्ज्वल भवितव्या संदर्भात केलेले विधान महत्वाचे आहे ते म्हणतात, " आज राष्ट्रीय कवितेची भूमिका पुष्कळच व्यापक झालेली आहे. पारतंत्र्याविषयीचा ज्वलंत त्वेष आणि स्वातंत्र्याची प्रकट अभिलाषा एवढेच तिचे मर्यादित स्वरूप राहिलेले नाही. आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध आणि अन्यायाविरुद्ध ती आता बंड पुकारू लागली आहे आणि कृत्रिम भेदातील असा समतेचा आणि मानवतावादाचा पुरस्कार करण्यात ती उदंड उत्साह दाखवू लागली आहे." पारतंत्र्यात सुरु झालेला हा राष्ट्रीय कवितेचा प्रवाह मराठी साहित्यात पुढील काळात अव्याहतपणे सुरुच राहिला आहे.

**निवडक संदर्भ ग्रंथ**

१. देशपांडे अ. ना., मराठी वाङ्मयाचा इतिहास, प्रकाशन, मुंबई.
२. पवार गो. मा. व हातकणंगलेकर म. द., मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९०७.
३. कुलकर्णी गो. म. व व. दि. कुलकर्णी, मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पहिली आवृत्ती, १९८८.
४. घवी रवींद्र व इतर, प्रदक्षिणा खंड २, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९१.